| | | | |
|---|---|---|---|
| MHRT050007272022 | दाखल तारीख | : | १८.०७.२०२२ |
| | नोंदणी तारीख | : | १८.०७.२०२२ |
| | निकाल तारीख | : | १०.०३.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०३ ०७ २३ |

भाग 'अ'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**<u>खेड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात</u>**

**(पिठासिन अधिकारी श्री. एस. एम. चव्हाण)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी.**

**(जाहीर दिनांक १०.०३.२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३९२/२०२२**
(गु.र.क्र.१९४/२०२२ पोलीस ठाणे, खेड)
**<u>निशाणी ६ लगत</u>**

**फिर्यादी** — **महाराष्ट्र सरकार**
**तर्फे पोलीस ठाणे, खेड,**
ता. खेड, जि. रत्नागिरी.

**प्रतिनिधीत्व** — **सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ.व्ही.जी.गायकवाड**

**आरोपी** — **संजय चिमणु देशमुख,**
वय – ५२ वर्षे, धंदा – मजुरी,
रा. भरणे नाका, गणेशनगर, ता.खेड, जि.रत्नागिरी.

**प्रतिनिधीत्व** — **आरोपीकरीता वकील श्री.एस.एस.शेठ**

भाग 'ब'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २७.०६.२०२२ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | २८.०६.२०२२ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | १८.०७.२०२२ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | ०४.१०.२०२२ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | २६.०९.२०२४ |
| निकालाची आरक्षीत तारीख | १०.०३.२०२६ |
| निकालाची तारीख | १०.०३.२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **संजय चिमणु देशमुख** | फौ.प्र.सं. कलम ४१अ(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली. | -- | महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) प्रमाणे | निर्दोष मुक्त केले. | -- | निरंक |

## <u>न्यायनिर्णय</u>

## (घोषित दिनांक १०.०३.२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाचे कलम १२(अ) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरिता चालविण्यात आला.

**०२.** अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांच्या साक्षीतून आरोपीविरुध्द दोषसिध्दीदर्शक पुरावे मिळून न आल्याने आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ नुसार निवेदन वगळण्यात आले.

**०३.** अभियोग पक्षाची हकीकत, अभिलेखावरील पुरावा व आरोपीचा बचाव विचारात घेता, मी खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्यावरील माझे निष्कर्ष मी त्या करिताचे कारणांसह विस्तृत करीत आहे.

| अ.क्र. | <u>विचारार्थ मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्षाने असे सिद्ध केले काय की, | |

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | दि.२७.०६.२०२२ रोजी २०:३० वा.चे सुमारास मौजे भरणे ग्रामपंचायत जवळील मोकळ्या जागेत, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे आरोपी हा गैरकायदा बिगरपरवाना दैनिक पेपरमध्ये प्रसिध्द होणाऱ्या कल्याण शुभ अंकावर स्वतःच्या फायद्याकरीता पैसे लावुन मटका जुगार खेळ खेळवत असताना मिळुन आला व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाचे कलम १२(अ) नुसार गुन्हा केला? | नाही. |
| ०२. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**०४.** आरोपीविरुध्द निश्चित केलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने या न्यायनिर्णयाच्या 'भाग क' मधील साक्षी पुराव्यांवर भिस्त ठेवली आहे.

**०५.** मी अभियोग पक्षातर्फे सौ.व्ही.जी.गायकवाड, सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपीकरीता वकील श्री.एस.एस.शेठ यांचा युक्तीवाद ऐकला.

**विचारार्थ मुद्दा क्र.१ करीता –**

**०६.** प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षाला संधी देवूनही केवळ एकाच साक्षीदाराला तपासण्यात आले. साक्षीदार ईस्माईल कादिरी यांनी घटनास्थळ पंचनाम्यावरील तसेच मुद्देमाल जप्तीच्या पंचनाम्यावरील अनु.क्र.२ वरील त्यांची स्वाक्षरी मान्य केली आहे, परंतु त्यामधील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. त्यामुळे अभियोग पक्ष पंचनामा सिद्ध करु शकले नाही. अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराला न्यायालयाच्या

परवानगीने फितूर घोषित करुन सुचक प्रश्न विचारुन अभियोग पक्षाची हकिकत त्यांच्यासमोर मांडली, परंतु सदर साक्षीदार यांच्याकडून अभियोग पक्षाला गुन्ह्याशी निगडीत एकही कबूली वदवून घेता आली नाही. त्यामुळे अभियोग पक्ष सदर साक्षीदाराकडून घटनास्थळ पंचनामा सिध्द करु शकले नाही.

**०७.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या अर्जावरुन इतर साक्षीदारांना वेळोवेळी समन्स काढण्यात आले, परंतु साक्षीसाठी त्यांना हजर ठेवण्यात यश आले नाही. पंच साक्षीदार वगळता इतर सर्व साक्षीदार हे पोलीस कर्मचारी आहेत तरीदेखील त्यांच्यापैकी कोणीही साक्षीसाठी न्यायालयासमक्ष हजर राहण्याची तसदी घेतली नाही, किंबहुना फिर्याद, पंचनामा हे सहाय्यक सरकारी अभियोक्ता सिध्द करु शकले नाही. आरोपी हा बेकायदेशीरपणे स्वतःचे फायद्याकरीता पैसे लावून जुगार खेळ खेळत होता हे अभियोग पक्षाने संशयापलिकडे सिद्ध केले नसल्याने मी विचारार्थ मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

## <u>विचारार्थ मुद्दा क्र.२ करीता –</u>

**०८.** वरील विवेचनावरुन मी या निष्कर्षावर येत आहे की, अभियोग पक्ष आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलिकडे जावून सिध्द करण्यात अपयशी ठरला. सबब, आरोपी हा निर्दोष मुक्ततेस पात्र आहेत.

**०९.** जप्त मुद्देमाल 'पावती बुक, कार्बन पेपर, काळ्या रंगाचा पेन' हे मुल्यहीन असल्याने ते अपील कालावधीनंतर नियमानुसार नाश करण्याबाबत व रोख रक्कम रु.१,२८५/– हिच्यावर कोणीही हक्क व अधिकार सांगितलेला नसल्याने ते सरकार जमा करण्याबाबत आदेश करणे योग्य राहिल. सबब, मी विचारार्थ मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. आरोपी **संजय चिमणु देशमुख** यांची महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल रोख रक्कम रु.१,२८५/– ही अपीलाचा कार्यकाळ संपल्यानंतर शासनाकडे जमा करण्यात यावी व इतर साहित्य नष्ट करण्यात यावे.

३. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र पुढील सहा महिन्याकरीता लागू राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.).

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.10 16:53:07 +0530

**(एस. एम. चव्हाण)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड,
ता.खेड, जि.रत्नागिरी.

**दिनांकः १०.०३.२०२६**

भाग 'क'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (**iii**))

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| अ.सा.१ | ईस्माईल अ. रहेमान कादिरी | पंच साक्षीदार | ६ लगत |

### ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

### ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

### क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

### मुद्देमाल

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | रोख रक्कम रु.१,२८५/- |
| २. | -- | पावती पुस्तक |
| ३. | -- | कार्बन पेपर |
| ४. | -- | काळ्या रंगाचा पेन |

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.10 16:53:13 +0530

**(एस. एम. चव्हाण)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड,

ता.खेड, जि.रत्नागिरी.

**दिनांकः १०.०३.२०२६**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | S.C.C. No.392/2022 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 10.03.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer on | : | 10.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 10.03.2026 |